# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

टेलि. : २४०१०४३७
२४०२०७८१
२४०१४७०१
फॅक्स : २४०२ ४०६८
Visit us at : http://mpcb.mah.nic.in

कल्पतरु पॉईंट, २/३/४ था माळा,
सिने प्लॅनेटसमोर,
सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व),
मुंबई - ४०० ०२२.

## माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या ॲपेलेट ऑथॉरिटीसमोर

**अपिल क्रमांक १५/२०११**

**सुनावणी दिनांक १४/१२/२०११**

श्री किशोर बापूराव टाकणे
सह्याद्री को.ऑप.हौ.सोसायटी,
बी.नं.सी-२, रुम नं.२/३, ८ बी,
सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४ — अपिल करणार

विरुध्द

माहिती अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
मुंबई — प्रतिवादी

## आदेश

अपिल करणार यांनी दिनांक १७/१०/२०११ रोजी माहिती अधिकारी यांच्याकडे मंडळातील ५१७ पदांच्या निर्मितीप्रकरणी माहिती मागितली होती. त्यामध्ये खालील मुद्दयांवर सुनावणीच्या दरम्यान चर्चा झाली व खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

**मुद्दा क्र.१** : मप्रनि मंडळाच्या आस्थापनेवर ६२६ पदे नव्याने निर्माण करण्यास मान्यतेसाठी पाठविलेल्या प्रस्तावावर पर्यावरण विभागाकडून मंडळास अर्ज केल्याच्या तारखेपर्यंत प्राप्त झालेल्या पत्राच्या छायाप्रती व त्यावर मंडळाने केलेल्या कार्यवाहीचे सर्व दस्तऐवज जोडपत्रांसह साक्षांकित करुन अर्जदार यांनी मागितलेले होते.

त्याबाबत वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, मप्रनि मंडळ यांनी दिनांक ११/११/२०११ च्या पत्राद्वारे सहाय्यक माहिती अधिकारी, मप्रनि मंडळ यांच्याकडे माहिती पाठविलेली होती. सदरहू माहिती प्राप्त झाल्यानंतर, माहिती अधिकारी, मप्रनि मंडळ यांनी दिनांक १५/११/२०११ रोजीच्या पत्राद्वारे अर्जदारास योग्य तो छायांकित प्रतीचा खर्च भरुन, सदरहू माहिती घेऊन जाण्याबाबत कळविले होते.

अर्जदार यांनी दिनांक १९/११/२०११ रोजी सदरहू पत्रातील माहिती त्यांनी विचारलेल्या कोणत्याही माहितीशी संबंधीत नसल्यामुळे, सदरहू माहिती घेतली नाही व योग्य ती माहिती मिळण्यासाठी विनंती केली.

वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांनी दिनांक ११/११/२०११ रोजी सहाय्यक माहिती अधिकारी यांना वरील अर्जाच्या अनुषंगाने दिलेले उत्तर आणि त्यासोबत जोडलेला पत्रव्यवहार (१९९ पाने) पाहता असे स्पष्ट दिसून येते की, अपिल करणार यांनी मुद्दा क्र.१ मध्ये जानेवारी २०११ नंतर पर्यावरण विभागामार्फत वरील पदे मंजूर करण्याकरिता झालेला पत्रव्यवहार उपलब्ध करुन देणे आवश्यक असताना, तो उपलब्ध न करुन देता, अनावश्यकरित्या त्यापूर्वीचा पत्रव्यवहार जोडण्यात आलेला आढळतो. अशा प्रकारे चुकीची माहिती देऊन केवळ अपिल करणार यांचा वेळ न घालवता, मंडळाची देखील स्टेशनरी कारण नसताना खर्ची पडलेली आढळते. अशा प्रकारे माहितीच्या अर्जाची व्यवस्थित छाननी न करता, अनावश्यक दिलेली माहिती अत्यंत अनर्थ असल्याचे आढळून येते. यापुढे माहितीच्या अधिकाराअन्वये प्राप्त झालेले अर्ज व्यवस्थित तपासूनच छायांकित प्रती करणे गरजेचे आहे, याची आस्थापना शाखेने नोंद घ्यावी. तसेच, कोणतीही चुकीची माहिती दिली जात नाही याची खातरजमा करणे गरजेचे आहे.

सुनावणीच्या दरम्यान कार्यालय अधीक्षक यांनी असे स्पष्ट केले की, २०११ नंतर पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासनाकडून आस्थापना शाखेकडे वरील संदर्भात कोणतेही पत्र आलेले नाही, असे स्पष्ट करण्यात आले. अशा परिस्थीतीमध्ये आस्थापना शाखेकडे जर माहिती उपलब्ध नसेल तर, ती देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

**मुद्दा क्र.२** मध्ये पर्यावरण विभागाच्या पत्र क्र.मप्रनि २०११/प्र.क्र.३८/अ/तां.क.२ पर्यावरण विभाग, दिनांक २४/८/२०११ ची प्रत साक्षांकित करुन द्यावी, तसेच सदरहू पत्रावर काय कार्यवाही केली ? याबाबत सर्व दस्तऐवज जोडपत्रांसहीत साक्षांकित करुन द्यावेत, अशी मागणी अपिल करणार यांनी केलेली होती.

आस्थापना शाखेच्या कार्यालय अधिक्षक यांनी सदरहू पत्र आस्थापना शाखेत उपलब्ध नसल्याचे स्पष्ट केले. अशावेळी जर वेळीच आस्थापना शाखेने सदरहू पत्राची प्रत उपलब्ध नाही, असे उत्तर दिले असते तर, अपिल करणार यांस अपिल करण्याची पाळी आली नसती. तसेच, माहिती अधिकारी यांनी मप्रनि मंडळाच्या इतर विभागांमध्ये त्याबाबत चौकशी केली असती. मात्र यापुढे माहिती अधिकारी यांनी केवळ आस्थापना शाखेकडून माहिती मागवून थांबू नये, तर त्याचवेळी ज्या विभागास सदरहू पत्र मार्क केलेले आहे त्यांच्याकडे व आवक वहीमध्ये माहिती घेऊन, त्यांच्याकडून माहिती मागवून घेणे आवश्यक आहे, असे अपिल प्राधिकरणाचे मत आहे.

वरील परिस्थितीमध्ये माहिती अधिकारी यांनी आवक कक्षामध्ये शोध घेऊन, सदरहू पत्राचा ठावठिकाणा लावणे इष्ट होईल. तसेच, सदरहू माहिती संबंधीत कक्षाकडून घेऊन, ती अपिल करणार यांनी १५ दिवसांमध्ये उपलब्ध करुन द्यावी. अपिल करणार यांनी त्यांच्या ताब्यातील छायांकित पत्राची प्रत माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावी.

जर वरीलप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही तर आपिल करणार यांनी द्वितीय अपिल दाखल करुन, त्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

येणेप्रमाणे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

दिनांक १४/१२/२०११ रोजी मुंबई येथून,

( द. त्रि. देवळे )
प्रथम अपिलीय अधिकारी